महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - २० नोव्हेंबर, २०२३

## -: **प्रसिद्धीपत्रक**:-

**विषय :-** लिपिक टंकलेखक-२०२१ व कर सहायक-२०२१ या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणीबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ३१ मे, २०२३ रोजी लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गासाठी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपस्थित उमेदवारांनी टंकलिखित केलेले एकुण शब्द, बरोबर शब्द व चुकीचे शब्द ही माहिती/यादी उमेदवारांना अवगत करण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर माहिती/यादी तयार करताना ज्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला होता त्याबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम असल्याचे दिसुन आले आहे. याबाबत उमेदवारांचा संभ्रम दुर करण्याकरीता प्रस्तुत चाचणीस उपस्थित उमेदवारांच्या Response Sheet तपासताना ज्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे त्याबाबतचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे:-

**१. मराठी टंकलेखन कौशल्य चाचणी:-**

(१) आयोगाच्या दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या समक्रमांकाच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद केल्यानुसार प्रस्तुत संवर्गासाठी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या मराठी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या १५०० key depression नुसार २३६ शब्द तयार होतात. त्यानुसार पात्रतेसाठी अराखीव उमेदवारांना ९३% च्या निकषानुसार किमान २१९ बरोबर शब्द व राखीव उमेदवारांना ९०% च्या निकषानुसार किमान २१२ बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते.

(२) ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी किमान पहिले २१९ शब्द बरोबर टंकलिखित केले तसेच ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवानी किमान पहिले २१२ शब्द बरोबर टंकलिखित केले त्या उमेदवारांना संगणक प्रणालीने निर्देशित केल्यानुसार टंकलेखन कौशल्य चाचणीत पात्र दर्शविण्यात आले आहे.

(३) ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणीवेळी २१९ पेक्षा कमी शब्द टंकलिखित केले आहेत तसेच, ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणीवेळी २१२ पेक्षा कमी शब्द टंकलिखित केले आहेत त्या उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) न करता त्यांना टंकलेखन कौशल्य चाचणीत अपात्र दर्शविण्यात आले आहे. (अराखीव उमेदवारांना किमान २१९ व राखीव उमेदवारांना किमान २१२ बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते)

(४) उपरोक्त मुद्दा क्रमांक (२) व (३) मधिल उमेदवार वगळून इतर सर्व उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) हे विषय तज्ज्ञांमार्फत करण्यात आले आहे. सदर मुल्यांकनावेळी ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणी उता-यातील पहिल्या २३६ शब्दांपैकी किमान २१९ शब्द बरोबर टंकलिखित केले आहेत तसेच ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणी उता-यातील पहिल्या २३६ शब्दांपैकी किमान २१२ शब्द बरोबर टंकलिखित केले आहेत त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. (टंकलेखन कौशल्य चाचणीच्या उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचनांनुसार चाचणी उता-यातील पहिल्या २३६ शब्दांपैकी वगळलेले शब्द, चुकीचे शब्द, पुनरावृत्तीच्या मार्गाने टंकलिखित केलेले शब्द हे चुकीचे म्हणून गणण्यात आले आहेत)

(५) आयोगाकडून दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपस्थित उमेदवारांनी टंकलिखित केलेले एकुण शब्द, बरोबर शब्द व चुकीचे शब्द ही माहिती/यादी ही तांत्रिक त्रुटीमुळे संगणक प्रणालीने दर्शविलेल्या चुक अथवा बरोबर शब्दांनुसार तयार करण्यात आली होती. परंतु, ज्या उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) हे विषय तज्ज्ञांमार्फत करण्यात आले आहे, त्या उमेदवारांचे चुकीचे शब्द व बरोबर शब्द सदर यादीमध्ये तांत्रिक त्रुटीमुळे चुकीचे दर्शविण्यात आले होते. यास्तव सदर माहिती/यादी ही रद्द करण्यात येत असुन उमेदवारांनी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या २३६ शब्दांमध्ये किती शब्द चुकीचे

टंकलिखित केले आहेत ते शेकडा प्रमाणात (७% व १०%) नमुद करून पात्र व अपात्रता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**२. इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी:-**

(१) आयोगाच्या दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या समक्रमांकाच्या प्रसिध्दीपत्रकात नमुद केल्यानुसार प्रस्तुत संवर्गासाठी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या २००० key depression नुसार ४०० शब्द तयार होतात. त्यानुसार पात्रतेसाठी अराखीव उमेदवारांना ९३% च्या निकषानुसार किमान ३७२ बरोबर शब्द व राखीव उमेदवारांना ९०% च्या निकषानुसार किमान ३६० बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते.

(२) ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी किमान ३७२ शब्द बरोबर टंकलिखित केले तसेच ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी किमान पहिले ३६० शब्द बरोबर टंकलिखित केले त्या उमेदवारांना संगणक प्रणालीने निर्देशित केल्यानुसार टंकलेखन कौशल्य चाचणीत पात्र दर्शविण्यात आले आहे.

(३) ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणीवेळी ३७२ पेक्षा कमी शब्द टंकलिखित केले आहेत तसेच, ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणीवेळी ३६० पेक्षा कमी शब्द टंकलिखित केले आहेत त्या उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) न करता त्यांना टंकलेखन कौशल्य चाचणीत अपात्र दर्शविण्यात आले आहे. (अराखीव उमेदवारांना किमान ३७२ व राखीव उमेदवारांना किमान ३६० बरोबर शब्द टंकलिखित करणे आवश्यक होते)

(४) उपरोक्त मुद्दा क्रमांक (२) व (३) मधिल उमेदवार वगळून इतर सर्व उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) हे विषय तज्ञांमार्फत करण्यात आले आहे. सदर मुल्यांकनावेळी ज्या अराखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणी उता-यातील पहिल्या ४०० शब्दांपैकी किमान ३७२ शब्द बरोबर टंकलिखित केले आहेत तसेच ज्या राखीव वर्गवारीच्या उमेदवारांनी चाचणी उता-यातील पहिल्या ४०० शब्दांपैकी किमान ३६० शब्द बरोबर टंकलिखित केले आहेत त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. (टंकलेखन कौशल्य चाचणीच्या उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचनांनुसार चाचणी उता-यातील पहिल्या ४०० शब्दांपैकी वगळलेले शब्द चुकीचे शब्द, पुनरावृत्तीच्या मार्गाने टंकलिखित केलेले शब्द हे चुकीचे म्हणून गणण्यात आले आहेत)

(५) आयोगाकडून दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उपस्थित उमेदवारांनी टंकलिखित केलेले एकुण शब्द, बरोबर शब्द व चुकीचे शब्द ही माहिती/यादी ही तांत्रिक त्रुटीमुळे संगणक प्रणालीने दर्शविलेल्या चुक अथवा बरोबर शब्दांनुसार तयार करण्यात आली होती. परंतु, ज्या उमेदवारांच्या Response Sheet चे मुल्यांकन (Assessment) हे विषय तज्ञांमार्फत करण्यात आले आहे, त्या उमेदवारांचे चुकीचे शब्द व बरोबर शब्द सदर यादीमध्ये तांत्रिक त्रुटीमुळे चुकीचे दर्शविण्यात आले होते. यास्तव सदर माहिती/यादी ही रद्द करण्यात येत असुन उमेदवारांनी टंकलेखन कौशल्य चाचणीमध्ये पहिल्या ४०० शब्दांमध्ये किती शब्द चुकीचे टंकलिखित केले आहेत ते शेकडा प्रमाणात (७% व १०%) नमुद करून पात्र व अपात्रता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग